जून, २०१८ - पुणे शहराला भारताच्या 'चलनवलनविकास' क्षेत्रातील पहिला दीपस्तंभ ठरण्याचा मान मिळाला आहे.एक दीपस्तंभ या भूमिकेतून नवनवीन उपाय हेरणे, ते राबवणे आणि त्यायोगे सुसंगत आणि वेगवान अशा नव्या चलनवलन प्रकल्पांचा एक आलेख तयार करणे यासाठी पुणे हे शहर एक संशोधनकेंद्र म्हणून कार्यरत होईल आणि भारतातील इतर शहरांच्या संपूर्ण चलनवलन व्यवस्थेचा कायापालट करेल.

देशभरातील स्पर्धकांमधून ग्रँड चॅलेंजमध्ये पुणे शहराची विजेता म्हणून निवड झाली. ग्रँड चॅलेंजच्या प्रमुख निकषांमध्ये स्थानिक शासनाचा बळकट पाठींबा, चलनवलन प्रगतीचा एक पारदर्शक आणि स्वच्छ अहवाल, आणि भारताच्या शहरी जनजीवनात असलेले त्या शहराचे स्थान याविषयांचा समावेश होता. नोव्हेंबर २०१७ मध्ये निती आयोगाचे **GoI,** प्रमुख कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांनी ग्रँड चॅलेंजची घोषणा केली होती.

एक दीपस्तंभ शहर म्हणून पुण्याला पहिली 'शहर चलनवलन प्रयोगशाळा' घेण्याचे यजमानपद मिळेल. हा एक असा उपक्रम असेल ज्यायोगे अत्यंत गुंतागुंतीच्या अशा चलनवलन समस्यांवर जलदगतीने उपाय शोधले जातील आणि ते राबवून सुसंगत आणि जलद अशा चलनवलन प्रकल्पांचा एक आलेख उभारला जाईल. ऑगस्ट २०१८ मध्ये या प्रयोगशाळेत एक दीर्घ मुदतीची कार्यशाळा घेतली जाईल. या कार्यशाळेत पुणे आणि भारतातील चलनवलन व्यवस्थेमधील अतिमहत्वाच्या समस्यांवर प्रभावी आणि प्रयोगशील काम करणाऱ्या काही व्यक्ती किंवा समूह एकत्र येतील. या कार्यशाळेत हे चमू काही चलनवलन सल्लागारांच्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या काही नव्या आणि कल्पक उपाययोजना पडताळतील. या कार्यशाळेच्या समाप्तीनंतर आलेले अनुभव आणि मिळालेल्या धड्यांवर ही प्रयोगशाळा कार्यरत राहील आणि असे प्रकल्प पुण्याखेरीज इतर भारतीय शहरांमध्ये राबवण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलेल.
रॉकी माउंटन इनस्टीट्युट या 'शहर चलनवलन प्रयोगशाळे'साठी महाराष्ट्र शासन आणि पुणे महानगरपालिका यांचा पाठींबा मिळवण्यासाठी काम करेल. हा प्रकल्प भविष्यात देशभरातील विविध 'दीपस्तंभ शहरांमध्ये'त्याची पुनरावृत्ती करता येईल आणि त्यांच्या गरजा लक्षात घेऊन राबवता येईल अशा लवचिक रीतीने तयार करण्यात आला आहे. या प्रयोगशाळेत शोधले गेलेले उपाय राष्ट्रीय पातळीवर 'ग्रीन मोबिलिटी स्कीम' अशा उपक्रमांमध्ये वापरता यावेत या उद्देशाने निर्माण झालेले असतील. या पथदर्शी भूमिकेतून 'शहर चलनवलन प्रयोगशाळा' तिचा आवाका वाढवेल आणि सहयोगपूर्ण, पारदर्शी आणि संलग्न असे चलनवलन पर्याय उपलब्ध करून देईल.

निती आयोग आणि आरएमआयच्या ‘इंडिया लीप्स अहेड’ या २०१७च्या मे महिन्याच्या अहवालानुसार यामुळे सन २०३०पर्यंत भारतात १ गिगाटन इतक्या कार्बन मोनॉक्साइडचं उत्सर्जन टाळता येईल  आणि सुमारे ३३० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी इंधनबचत होऊ शकेल.

ऑगस्ट २०१८ मधील पुण्यात होणाऱ्या कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या बहुउद्देशीय चमूंसाठी ‘शहर चलनवलन प्रयोगशाळे’ ची चालक समिती लवकरच एक अर्जप्रणाली तयार करेल. अधिक माहितीसाठी, कृपया रायन लेमेल यांच्याशी (rlaemel@rmi.org) आणि श्री. श्रीनिवास बोनाला यांच्याशी (smartcity@punecorporation.org) येथे संपर्क साधा.